# Environment, Literature and Culture

# पर्यावरण, साहित्य आणि संस्कृती

**प्रा. ममता राऊत**
**जे.एम. पटेल महाविद्यालय, भंडारा**
**मो. 8857944703**
मउंपस.उंउजंतंनज74 ⁄ हउंपसण्बवउ

मानव हा पर्यावरणाचा एक घटक आहे आणि मानवी जीवनाच्या जडणघडणीत पर्यावरणाचा महत्वाचा वाटा राहिलेला आहे. मानवाची बोलीभाशा, संस्कृती, सामाजिक रूढी–परंपरा, जीवन–जाणिवा सर्वच पर्यावरणाषी निगडीत असतात. पर्यावरण आणि मानवी संस्कृती यांचा परस्पर संबंध आहे. तसेच साहित्य आणि समाज यांचाही परस्पर संबंध आहे, साहित्य हा समाजाचा आरसा असतो. समाजात घडणाऱ्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मीक व राजकीय परिस्थितीचे दर्षन साहित्यातून घडत असते.

मानवी जीवनाच्या जडणघडणीत सामाजिक वातावरणाबरोबर नैसर्गिक वातावरणाचाही प्रभाव पडत असतो. समाजात सतत विविध घडामोडी घडत असतात; बदल होत असातात आणि मानवी जीवनावर त्याचा प्रभाव पडत असतो. हया सर्व घडातोडींचे चित्रण निष्चितच साहित्यातून उमटत असते. समाज हा सभोवतालच्या निसर्गांनी व्यापलेला आहे. समाजाचा सर्वांगीन विकास पर्यावरणावर अवलंबून असतो आणि या समाजातूनच मानवनिर्मीत पर्यावरण आकाराला येते.

साहित्य, समाज व संस्कृती यांचा पर्यावरणाषी घनिश्ट येत असल्यामुळे मानवी जीवनावर निसर्गातील बदलणाऱ्या वातावरणाचा कळत न कळत प्रभाव पडत असतो. त्या–त्या भौगोलिक प्रदेषानुसार वातावरणाषी निगडीत मानवाची बोली–भाशा, त्यांचे रंग–वर्ण, उंची, राहणीमान, संस्कृती, व्यवसाय त्यांची विचारपद्धती इत्यादी आकाराला येत असतात.

मानवी विकास बऱ्याच अंषी निसर्गावरच कसा अवलंबून असते हे स्पश्ट करतांना डॉ. विठ्ठल घारपूरे म्हणतात, ''मानवी विकासावर नैसर्गिक पर्यावरणाचा केवळ परिणामच होतो असे न मानता मानवी विकासामध्ये कार्यरत असलेल्या मानवाची ईच्छा व स्फूर्ती सुद्धा निसर्गावर अवलंबून असते. अगदी टोकाची भूमिका म्हणजे मानव हा निसर्गाचाच अविभाज्य भाग असून इतर प्राणी मात्राप्रमाणेच त्याच्या सर्व हालचाली नैसर्गिक घटकानुसार होत असतात''?

अर्थात प्रत्येक मानवी घटना ही निसर्गामुळे बदलते. सतत बदलणाऱ्या निसर्गचक्रानुसार मानवाचे जीवन प्रवाहीत होत असते. तसेतसे मन–बुद्धी, विचार या मनुश्याच्या मुळ वृत्ती–प्रवृत्तीत फरक पडतो. तसेच मानवी प्रगती किंवा अधोगती, सुख–दुःख इत्यादीवर या पर्यावरणाचा प्रभाव पडत असतो. एकंदरच मानवी विकास–अविकास निसर्गाषी, पर्यावरणांषी संबंधीत आहे. आणि म्हणून साहित्य याला अपवाद नाही.

पर्यावरणषास्त्रात निसर्ग आणि मानव या गोश्टी घटकांचा अभ्यास केला जातो. निसर्ग आणि मानव हे परस्पर एक दुसऱ्यावर अवलंबून आहेत. नैसर्गिक पर्यावरणातूनच मानवी संस्कृती आकाराला येत असते. अर्थातच मानव निसर्गाषी जुळलेला असल्यामुळे सहाजिकच साहित्यातून नैसर्गिक पर्यावरणाचे प्रतिबिंब उमटत असते. रा. ग. जाधव यांनी व्यापक दृश्टीने पर्यावरणाची संकल्पना मांडली आहे. ''मानव हा देखील पषुपक्षी व वनस्पती यांच्यासारखाच एक सजीव आहे. तथापी हा सजीव प्राणी बुद्धीमान आहे. नैसर्गिक पर्यावरणांषी प्राणी व वनस्पती यांच्याप्रमाणेच मानव हा देखील बांधलेला आहे हे खरेच. पण हे नैसर्गिक पर्यावरण स्वतःषी अनुकुल करून घेण्याची क्षमता त्यात अधिक आहे.''2

अर्थात मानवाने बदलत्या ऋतुमानानुसार स्वतःच्या जीवनषैलीत बदल केला आहे. तसेच पर्यावरणात हस्तक्षेप करून स्वतःच्या बुद्धीसामर्थ्याने तो अनुकुल–प्रतिकुल परिस्थितीचा सामना करीत असतो. याचे चित्रण मराठी साहित्यात आलेले आहे.

साहित्य हा पर्यावरणाचा एक भाग आहे. निसर्ग आणि मानव यांचे दृढ संबंध असल्यामुळे सातत्याने प्राचीन साहित्यापासून ते अर्वाचीन साहित्यापर्यंत कवी लेखकांनी कथा, कादंबऱ्या, कविता, नाटक व प्रवासवर्णने हया साहित्यप्रकाराद्वारे मराठी साहित्यात निसर्गाचे सुंदर, रमणीय, मनोहारी, वेधक चित्रण केले आहे. याबरोबरच पर्यावरणातून आकार घेणारे मानवी जीवन, निसर्गातून उदयास आलेली संस्कृती, पर्यावरणाचा सामाजिक जीवनावर पडणारा प्रभाव इ. प्रमुख घटकांचा साहित्यात अभ्यास झालेला आहे. निसर्ग आणि मानव व मानव आणि साहित्य, पर्यावरण आणि साहित्य यांचे जिव्हाळयाचे अतुट नाते उलगडून सांगताना, 'अखिल भारतीय साहित्य संम्मेलनात अध्यक्षीय भाशण करतांना फादर दिब्रिटो म्हणतात, ''मी निसर्गाच्या सानिध्यात वाढलो आहे. निसर्गाने माला घडविले आहे. आपले पर्यावरण आपल्याला घडवत असते. त्यामुळे मी निसर्गाच्या प्रेमात आहे. निसर्ग वाचला तरच माणूस वाचणार आहे.''3

निसर्गाचे संरक्षण, संवर्धन करणे, पर्यावरणाचा समतोल राखणे हे सर्वस्वी मानवावर अवलंबून आहे. हे फादर दिब्रिटो पटवून सांगतात. साहित्यातही हया चर्चा होत असतात. प्रत्येक कालखंडातील साहित्यकृतीत समाजाचे व संस्कृतीचे विशेष प्रकट होत असतात. जसे अगदी 16 व्या षतकातच संत तुकारामांनी मानवी जीवनात पर्यावरणाचे असलेले महत्त्व स्पश्ट केले आहे. व वृक्षसंवर्धनाचा सल्लाही दिला आहे.

वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे ।
पक्षीही सुस्वरे आळविती ।।
नाही गुण दोश अंगा येत ।।
आकाष मंडप पृथिवी आसन ।
रमे तेथे मन क्रीडा करीं।।
कथा कमडंलू देह उपचारा ।
जाणवितो वारा अवसारू ।।
तुका म्हणे होय, मनाषी संवाद ।
आपुलाची वाद आपणाषी ।।

संत तुकाराम महाराज चित्त षुद्धींसाठी निसर्गाच्या सानिध्यात जातात. निसर्गाषी एकरूप होऊन अंतर्मुख पावतात. जीवनातील सुख–दु:ख, मानसिक ताण–तणाव निसर्गातील पवित्र–रम्य वातावरणाने मनुश्य दूर करू षकतो. एक प्रकारचा निसर्ग हा अनादिकाळापासून मानवाचा सखाच आहे. हे संतांनी सुद्धा मान्य केले आहे.

मराठी साहित्यात सामाजिक परिस्थितीचे चित्रण करतांना अनेक कथा–कादंबऱ्यात व वैचारिक ग्रंथात पर्यावरणाच्या अनुकुल व प्रतिकुल परिणामाचे वर्णन आलेले आहे. संताप्रमाणेच थोर समाजसुधारक, षेतकऱ्याचे तारणहार महात्मा फुले यांनी सुद्धा पर्यावरणाच्या प्रतिकुल परिस्थितीचे मानवी जीवनावर होणारे परिणाम त्यांच्या 'षेतकऱ्याचे असूड' या ग्रंथात स्पश्ट केले आहे. दुश्काळामुळे षेतकऱ्याची जी दयनिय अवस्था होत असते त्याचे अत्यंत भेदक वर्णन म. फुलेंनी केलेले आहे. दुश्काळामुळे हवालदील झालेला षेतकरी कसा कर्जबाजारी होतो. ही वास्तविकता त्या ग्रंथाद्वारे लक्षात येते, यासंबंधी महात्मा फुले लिहीतात, ''दृश्काळात चारापाण्यावाचून लक्षावधी बैलांचा सरसकटीने खप होऊन त्याचे वाटोळे झाले. दुसरे असे की, षेतकऱ्याजवळ उरलेल्या खल्लड बैलास फॉरेस्ट खात्याच्या अनिवार त्रासामुळे व गायरानाच्या कमतरतेमुळे पोटभर चारा–वैरण मिळेनाषी होऊन त्यांची संतती दिवसेंदिवस होत चालल्या रोगाने दरवर्शी षेतकऱ्यांचे गोठयातील दावणीचे खुंटे उपटले जातात.''5

परंतु फुले हे चित्रण करून थांबत नाही तर षेतकऱ्यांसाठी व षेतीसाठी निसर्गाच्या सहय्याने, पर्यावरणातील नैसर्गिक साधन–संपत्तीचा संचय करून मानवी विकास, षेती व्यवसाय कसा योग्य रीतीने करता येईल याबद्दल अनेक उपाययोजना षेतकऱ्यांना पर्यावरणीय संकंटाचे निवारण कसे करता येईल याची कारणमीमांसा त्यांनी केली.

पर्यावरणातील दुश्काळजन्य स्थिती षेतकऱ्यांचे जीवन जगणे कसे कठीण करते व त्यांच्या गुरा–ढोरासहीत समग्र जीवनाला विस्कळीत करते. हे फुलेंनी अतंत्य तळमळीने त्यांच्या ग्रंथात लिहीले आहे. षेतकऱ्यांची अवनती सर्वप्रथम म. फुलेंनी अनुभवली. महाराश्ट्रातील दुश्काळी स्थिती–गतीचे वर्णन हरि नारायण आपटे यांनी ही 'काळ तर मोठा कठीण आला' (1898) या कथा संग्रहात केले आहे. निसर्गाच्या कोपामुळे तत्कालीन षेतकरी दुश्काळी परिस्थितीचा कसा सामना करतो. पाऊसा अभावी मानवी जीवन कसे प्रभावीत होते. याची वास्तविकता हरिभाऊनी पटवून दिली.

महाराश्ट्रातील षेतकरी संपूर्णतः षेतीवर अवलंबून असतो आणि षेती निसर्गावर. काही–काही दुर्गम भागात निसर्गाच्या वाईट परिस्थितीचाच सामना षेतकऱ्यांना करावा लागतो. 'कृश्णराव भालेराव यांच्या 'बळीबा पाटील' (1888) या कादंबरीतून त्यांनी दुश्काळग्रस्त षेतकऱ्यांची अतंत्य भेदक परिस्थितीची वास्तविकता चित्रीत केली आहे. दुश्काळ पर्यावरणाचा एक भाग आहे. त्यामुळे मानवाच्या संपूर्ण जगण्यावर त्यांचा गंभीर परिणाम होतो. पावसाअभावी सर्वसामान्य जनजीवन, सामाजिक, आर्थिक स्थिती विस्कळीत हाते. हे अगदी खरे आहे. परंतु या संकटातून वाचण्याचा मार्ग षासनाने व मानवाने काढायला पाहीजे. हे विचार प्रकर्शाने मराठी साहित्यातून व्यक्त होते.

षेतकरी हा ग्रामीण जीवनाचा अविभाज्य अंग असल्यामुळे षेतकऱ्यांचा विचार करतांना त्यांच्या भोवतालच्या वातावरणाचा त्यांच्या जीवनाषी सुसंगत असलेल्या घटकांचा विचार प्रामुख्याने करावा लागणार आहे. षेतकऱ्यांच्या जीवनात पर्यावरणामुळे वाईट प्रसंग येतात तसेच काही आनंददाही प्रसंग येतात. ना.धो. महानोरांच्या 'रानातील कविता' मध्ये रानाचे सौंदर्य, निसर्गाचे वेगळेपण, रान आणि षेतकरी यांचे अखंड नाते व्यक्त केले आहे. डॉ. रविन्द्र ठाकूर लिहितात त्याप्रमाणे, ''महानोरांच्या कवितेत षहरी ताण प्रथमच कमी झालेला दिसतो हे रान षेतकऱ्यांचे आहे. त्यांच्या कवितेत षेत व षेतकरी दोघेही बीजारोपण, अंकुरसंवर्धन करतात व या निर्मितीचक्रात रानात राबणाऱ्या माणसाच्या जीवनाचा एक भाग बनलेला आहे. रानाची व मानसाची निर्मिती षक्ती, सर्जनषक्ती एकमेकांषी बांधलेली आहे. या जाणिवेतूनच महानोरांची कविता जन्म घेते.''6

ग्रामजीवनाचा ठाव घेण्यापेक्षा ही कविता नागर अभिरूचीता सुखावणाऱ्या रोमॅंटीक भाशाविलासाकडेच अधिक झुकली. त्यामुळे महानोरांच्या रानातल्या कविता रान, निसर्ग, सौंदर्य, प्रेम व प्रणयभावना इ. भाव व्यक्त करून साहित्यातून आपले वेगळेपण जपते.

पर्यावरण खऱ्या अर्थाने ग्रामीण भागात जीवंत आहे. ग्रामीण भागातील साध्या भोळया मानसानीच निसर्गावर खरे प्रेम केले आहे. निसर्गावर संपुर्णतः अवलंबुन असणारे ग्रामीण क्षेत्रातील माणसांना कधी – कधी पर्यावरणाच्या भीशण परिस्थितीचा ही सामना करावा लागतो याचे दर्षन मराठी साहित्यातून घडते. वन्यप्रेमी प्रसिद्ध कादंबरीकर व्यंकटेष माडगुळकर व पक्षीतज्ञ मारूती चिनमपल्ली यांनी मानवी जीवनाता पर्यावरणाचे महत्त्व तसेच मानव व निसर्ग यांचे दृढ नाते अधोरेखित करून, मराठी साहित्याला वैज्ञानिक दृश्टीकोन देऊन साहित्याचे दालन समृद्ध केले आहे.

पर्यावरण कषाप्रकारे मानवी जीवनात सौंदर्य करून समृद्धता घेऊन येतो, तर कधी विपरीत स्थितीचाही दाखला देतो. व्यंकटेष माडमुळकर यांनी ग्रामीण भागातील साधे–भोळे माणसं त्यांची भौगोलिक परिस्थिती, सामाजिक व्यवस्था, तिथल्या रूढी–परंपरा, व्यवसाय त्यांच्या 'बनगरवाडी' या कादंबरीद्वारे प्रत्ययास येते. 'बनगरवाडी' या गावातील भौगोलिक प्रदेषाची हुबेहुब वातावरण निर्मिती माडमुळकरांनी त्यांच्या षब्दात वर्णन केल्यामुळे अजूनही वाचकांच्या मनात 'बनगरवाडी' घर करून आहे. 'माणदेषी माणस' हया पुस्तकांत माडगुळकरांनी अनेक व्यक्तीरेखाद्वारे तिथल्या भौगोलिक प्रदेषाची व त्या खानदेषातील माणसाना पर्यावरणाच्या संकटामुळे करावा लागणारा संघर्श अतंत्य वेधकपणे चित्रीत केलेला आहे. ग्रामीण भागात राहणाऱ्या माणसाचे भाबळेपण, अषिक्षित असुनही निसर्गाचे असणारे ज्ञान, त्यांची भाशाषैली, रूढी–परंपरा, त्यांची संस्कृती इ. चे दर्षन तर घडते परंतु निसर्गाच्या सानिध्यात राहणाऱ्या हया साध्या माणसात जो जीव्हाळा, प्रेम आहे, ती दगडासारखी आहेत. तरी हे भांडवली कारणामुळे बदलणाऱ्या षहरातील माणसात बघायला मिळत नाही. हे माडगुळकरांनी

साहित्यात आर्वजून नोदंविले आहे. याबरोबरच दुश्काळामुळे तिथल्या जनमानसावर होणारा परिणाम, षिक्षणावर होणारा परिणाम याचे चित्रण 'बनगरवाडी' कादंबरीत ही आलेले आहे.'' यंदा पावसान बनगरवाडीकडे पुरती पाठ फिरविली आहे. विहिरी कोरडया पडल्या आहेत. झाडेझुडपे वाढून खोड झालेली आहेत. आजकाल षाळेला कुणी पोरच येईनाषी झाली आहे.''7 ही खंत बनगरवाडी चा नायक राजाराम मास्तर व्यक्त करतो.

त्यामुळे मराठी साहित्यात 'बनगरवाडी' आपले अस्तित्त्व अजूनही टिकवून आहे. हया कादंबरीचे इंग्रजी भाशेत ष्जीम टपससमहम ींक दव ृवतकेष असे रूपांतर करण्यात आले आहे. माडगुडकरांनी त्यांच्या सर्वच साहित्याद्वारे भौगोलिक प्रदेषाची वातावरण निर्मिती करून तो प्रदेष, ती खेडी तिथला निसर्ग जीवंत केला आहे. व मराठी साहित्यांचे सौंदर्य वाढविले आहे.

निसर्गप्रेमी, वनअभ्यासक व पक्षीतज्ज्ञ मारूती चितमपल्ली यांनी सुद्धा मराठी साहित्याद्वारे पर्यावरणाचे खरे महत्त्व पटवून दिले आहे. चितमपल्ली यांनी आयुश्याची तब्बल 40 वर्श महाराश्ट्रातील, विदर्भातील राना–वणामध्ये घालविले आहे. त्यांनी जंगल आणि निसर्ग अगदी जवळून पाहिले. 'जंगलातील वास्तव्यातून त्यांनी वृक्षवल्ली, वन्यप्राणी, पषुपक्षी, त्यांच्या प्रजाती यांचे अती षुक्ष्माती षुक्ष्म निरिक्षण करून त्यांनी मराठीत अनुभवसिद्ध ग्रंथसंपदा लिहून साहित्यात मोलाची भर घातली आहे. मारूती चितमपल्ली यांनी, घरटयापलीकडे (1995), पक्षी जाय दिगंतरा (1983), रातवा (1993), रानवाटा (1991), चैत्रपालवी (2004), जंगलाची दुनिया (2002) इत्यादी ग्रंथसंपदाद्वारे–पर्यावरणातील बदलत्या ऋतूंचे, घनदाट वनराईचे रम्य वर्णन, ऋतूमानाप्रमाणे बदलणाऱ्या पषू–पक्ष्यांचे जीवन, जंगलातील फुला–पानाचे सौंदर्य, वृक्षवल्लीचे रम्य देखावे, पक्ष्यांची गुंजारव, वातावरणातील बदलांचे, मानवासहित निसर्गातील विविध घटकावर होणारे परिणाम अतंत्य हुबेहुब षब्दात चितमपल्ली यांनी चित्रीत केले आहे जणुकाही निसर्गाचा सुंदर, मनोहारी देखावाचा डोळयासमोर तरळतो.

**याबद्दल चितमपल्ली लिहीतात,**

''तब्बल चार दषकांचा काळ मी जंगलात घालवला त्यामुळे स्वाभाविकपणे निसर्गाच्या इतक्या निकटतम सानिध्यात वातावरणातील बदलांचे, निसर्गातील विविध घटकावर होणारे परिणाम अतंत्य जवळून अनुभवले. या अवलोकातून अनेक आष्चर्यकारक गोश्टी उमगल्या, जगंलातील मुक्कामात असंख्य वन्यजीव, पक्ष्यांच्या, प्रजातीचे मी बारकाईने निरीक्षण केले. कोकणच्या समुद्रकिनाऱ्यावरील समुद्री पक्षी तसेच समुद्री जीवांच्या हालचालीचाही अभ्यास केला. त्यातुनही पावसाळयापूर्वीचे सृश्टीतील असंख्य आष्चर्यजनक बदल टिपता आले.''8

मारूती चितमपल्ली यांची ग्रंथसंपदा म्हणजे साहित्याद्वारे केलेली निसर्गाची पुजा आहे. संषोधन आहे, अभ्यास आहे व निसर्गाचे विज्ञान आहे. निसर्गाचे विविधांगी मनोवरी वर्णन करणारा चितमपल्ली सारखा ललित लेखक मराठी साहित्यात दुसरा नाही. त्यांनी मेळघाट व्याघ्रप्रकल्प, नागझिरा अभयारण्य, नवेगांव राश्ट्रीय उद्यान, कर्नाळापक्षी अभयारण्य ईत्यादींच्या विकासात त्यांचे संपूर्णतः योगदान राहीले आहे. चितमपल्ली यांनी निसर्गाचा मनसोक्त आस्वाद घेऊन पर्यावरणाचे खरे योगदान, मराठी साहित्यात नोंदविले आहे.

एकूणच मराठी साहित्यात पर्यावरणाचे स्थान अनादीकाळापासून अबाधीत आहे. मग ते मानवाच्या सामाजिक जीवनात असो की, सांस्कृतिक जीवनात असो. मानवाच्या संस्कृतीलाही पर्यावरणाचे संदर्भ आहेत. संस्कृती ही मानवाद्वारेच निर्माण होत असते. भोवतालच्या भौगोलीक परिसरानुसार एक विचारपद्धती जन्माला येते. आणि यातूनच सांस्कृतिक जिवनषैलीचा उदय होतो. पर्यावरणाचा जसा सामाजिक जीवनावर परिणाम होतो. तसा सांस्कृतीक जीवनावरही प्रभाव पडतो. मराठी साहित्यात प्रादेषिक, ग्रामीण, दलित–आदिवासी समाजाच्या सांस्कृतिक जडणघडणीत पर्यावरणाचा मोठा वाटा आहे. भौगोलिक प्रदेषानुसार पर्यावरणातील जीवनातही विविधता आढळून येते. याचे प्रत्यक्ष दर्षन मराठी साहित्यातून घडते.

**संदर्भ सूची :–**


1) डॉ. घारपुर विठ्ठल – सामाजिक व सांस्कृतिक भूगोल', पिंपळापुरे ॲण्ड. कं. पब्लिसर्स.

2) प्रा. जाधव रा. ग. – पर्यावरणीय प्रबोधन आणि साहित्य, स्नेहवर्धन प्रकाषन, 1996, नागपूर

3) फादर दिब्रिटो – अध्यक्षिय भाशण, अखिल भारतीय साहित्य संमेलन, उस्मानाबाद, 2020

4) संत तुकाराम – 'श्री तुकाराम महाराजाची गाथा' गीताप्रेस गोरखपूर, चौथी आवृत्ती, पृ.क्र. 145

5) पू. फडके य. दि. – 'महात्मा फुले समग्र वाङ्मय,' महाराश्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृतीक मंडळ, मुंबई, 1991

6) डॉ. रविन्द्र ठाकूर – 'साहित्य, समीक्षा आणि संवाद दिलीपराज प्रकाषन, पुणे

7) व्यंकटेष माडगुळकर – 'बनगरवाडी', मौज प्रकाषन गृह, मुंबई

8) मारूती चितमपल्ली – 'निसर्गवाचन' पद्मगंधा प्रकाषन, पुणे.